आईच्या वाढदिवसाची भेटवस्तू



लेखक: जोन

मराठी: अश्विनी बर्वे

आईच्या वाढदिवसाची भेटवस्तू



“डेव्ही,” पीटर म्हणाला,

“तुला माहीत आहे आज काय आहे ते?”


“हो, मला माहित आहे,” डेव्ही उत्तर दिले.

“आज सोमवार आहे."

"नाही, मूर्खा," पीटर म्हणाला,

आज आईचा वाढदिवस आहे."





“आपण तिला सांगायला पाहिजे,”
डेव्ही म्हणाला.
“तिला माहीत आहे,”
पीटर म्हणाला.
”मी तिच्यासाठी भेटवस्तू आणायला जाणार आहे.”
"मी तुमच्यासोबत येऊ का?"
डेव्हीने विचारले.
"तू शांत बसशील का?" पीटरने विचारले.
"बसेन," डेव्ही म्हणाला.


डेव्ही म्हणाला, "चला तर मग, तिथे मला
पण भेटवस्तू मिळेल का?" पीटर म्हणाला,
“अरे आज आईचा वाढदिवस आहे.
आपण तिच्यासाठी भेटवस्तू घेणार आहोत.”
‘ठीक आहे!" डेव्ही म्हणाला.



“आईला काय आवडेल भेटवस्तू म्हणून”
पीटरने विचारले.
”एक डंप ट्रक” डेव्ही म्हणाला.



“आईला डंप ट्रक नाही चालणार,"
पीटर म्हणाला.
"मग रोलर स्केट्स?” डेव्हीने सुचवले.
"नाही," पीटर म्हणाला.



“आईला लिपस्टिक आवडेल,” पीटर म्हणाला.

“तू दुकानदाराला विचार.”

“ठीक आहे मी विचारतो,” डेव्ही म्हणाला.



"मला लिपस्टिक हवी आहे," डेव्ही म्हणाला.
"तुम्हाला कोणता रंग हवा आहे?"
त्या माणसाने विचारले.
"आमच्याकडे लाल, गडद लाल, गुलाब लाल
किंवा गुलाबी रंग आहेत."



“आम्हाला हिरव्या रंगाची हवी आहे,”
डेव्ही म्हणाला.
"आमच्याकडे हिरवी लिपस्टिक नाही,"
तो माणूस म्हणाला.
"पण तुम्ही हा लॉलीपॉप घेऊ शकता.
तो हिरवा आहे.“
"धन्यवाद," डेव्ही म्हणाला.





“तुला लिपस्टिक मिळाली का?”
पीटरने विचारले.
"नाही," डेव्ही केले म्हणाले.
“पण त्या दुकानदाराने हे लॉलीपॉप दिले.”
“चल, पुढच्या दुकानातजाऊया,”
पीटर म्हणाला.

“तुमच्याकडे काय मिळते?”
पीटरने विचारले.
"टोप्या," एक स्त्री म्हणाली.



“कृपया मला एका महिलेसाठी
टोपी दाखवा,” पीटर म्हणाला.



“कोणत्या मापाची?” त्या स्त्री विचारले.
"काय?" पीटरने विचारले.
“म्हणजे तुला किती मोठी हवी आहे?”
“तिच्या कानापर्यंत येणारी चालेल”
पीटर म्हणाला.





“माझ्याबरोबर या,” ती स्त्री म्हणाली.
“चल डेव्ही,” पीटर म्हणाला.

"बघ!" डेव्ही म्हणाला,
“मला एक पीस सापडले आहे.”
“नाही, ते टोपीबरोबर येते,”
पीटर म्हणाला, “आणि नीट वाग.”
“ठीक आहे, डेव्ही म्हणाला.





“बघ इथे किती छान वस्तू आहेत.”
डेव्ही म्हणाला.
“तुझ्या कानाला काय लागले आहे ते बघ,”
पीटर म्हणाला.

“बघ एकावर तारा लावलेला आहे,
ती मला आवडली,” डेव्ही म्हणाला.
“मला पण,” पीटर म्हणाला,
“आपण तीच घेऊ या.”





"पाच डॉलर होतील, त्याचे,"
तो माणूस म्हणाला.
"अरे देवा!" पीटर म्हणाला.


"मी पैशाचे तर विसरूनच गेलो."
"डेव्ही तुझ्याकडे काही पैसे आहेत का?"
पीटरने विचारले.
"शंभर डॉलर," डेव्ही म्हणाला.
"खरंच?" पीटरने विचारले.
"मिलियन" डेव्ही म्हणाला.
"वेडा आहेस का?" पीटर म्हणाला.
"तुझ्याकडे खरोखर किती आहेत?"
"एक पेनी," डेव्ही म्हणाला.
"ते पेनी नाहीत," पीटर म्हणाला.
"ते दहा सेंट आहेत फक्त."





"मला माफ करा," पीटर म्हणाला.
"आम्ही हे कानातले घेऊ शकत नाही.
आम्ही त्याचे पैसे देऊ शकत नाही.“
"काही हरकत नाही," तो माणूस म्हणाला.
"हे घ्या. ह्या पेपर क्लिप्स घ्या.
ह्या सुद्धा सुंदर आहेत."

"धन्यवाद," पीटर म्हणाला.
"काही हरकत नाही," तो माणूस म्हणाला.
"पण कृपया तुमच्या भावाला
माझ्या घड्याळातून बाहेर जायला सांगा."



"त्यांच्याकडे आईला उपयोगी पडेल अशी एखादी वस्तू असेल," पीटर म्हणाला.

"तो केसांचा ब्रश कसा राहील?"

डेव्हीने विचारले.

"तो केसांचा ब्रश नाही," पीटर म्हणाला.

"तो भांडी घासण्याचा ब्रश आहे!“

"ही छान भेट आहे," डेव्ही म्हणाला.

"आईला वस्तू घासायला खूप आवडतं,"

पीटर म्हणाला.

"तिला मला घासायला पण आवडतं,"

डेव्ही म्हणाला.

"आपण आत जाऊया नको!"



"बघ, पीटर! प्राणीसंग्रहालय!" डेव्ही म्हणाला.
"ते प्राणीसंग्रहालय नाही," पीटर म्हणाला.
"ते पाळीव प्राण्यांचे दुकान आहे."

"आईसाठी एक पाळीव प्राणी घेऊया,"
डेव्ही म्हणाला.
"हो!" पीटर म्हणाला.




"तुमच्याकडे हत्ती आहेत का?" डेव्हीने विचारले.
"आज नाहीत, बाळा," तो माणूस म्हणाला.

"तो समुद्रातला खरा शंख आहे का?"
पीटरने विचारले.
"अगदी खरा." तो माणूस म्हणाला.



"याची किंमत किती आहे?" पीटरने विचारले.
"तुम्ही हे घेऊ शकता," तो माणूस म्हणाला.
"अरे! धन्यवाद!" पीटर म्हणाला.

"बघ, पीटर! उंदीर!" डेव्ही म्हणाला.
"आईला उंदीर खूप आवडेल!"



"ही तुझ्या आईसाठी भेट आहे का?"
त्या माणसाने विचारले.
"हो," पीटर म्हणाला.


"शेजारच्या दुकानात बघ," तो माणूस म्हणाला.
"डेव्ही!" पीटर म्हणाला.
"तिथे काय लिहिलंय ते तुला वाचता येतं का?"





"हो, मी वाचू शकतो," डेव्ही म्हणाला.
“काय?" पीटर म्हणाला.
"गवतावरून खाली उतर!" डेव्ही म्हणाला.
"त्यावर 'गिफ्ट शॉप' असं लिहिलं आहे,"
पीटर म्हणाला.

"त्यांच्याकडे आतमध्ये एखादी
भेटवस्तू असू शकते.“ पीटर म्हणाला.
“ती भेटवस्तू आहे?" डेव्हीने विचारले.
"नक्कीच," पीटर म्हणाला.




“तू आत जा," डेव्ही म्हणाला.
"मी इथेच थांबेन."

“ठीक आहे," पीटर म्हणाला.
"पण याच पायरीवर थांब!"
डेव्ही म्हणाला. “हो, इथेच आहे मी.”



"भिंगरी, आणि फुगे!"
एक माणूस विकत होता



"भिंगरी आणि फुगे!"





“ती भिंगरी कितीला आहे?” डेव्हीने विचारले.
“दहा सेंटला मिळेल.” तो माणूस म्हणाला.

“पण माझ्याजवळ फक्त एक डाईम आहे,”
डेव्ही म्हणाला.
“तेवढे पुरतील,” तो माणूस म्हणाला.



तुला भेटवस्तू सापडली का?"
डेव्हीने विचारले.
"नाही," पीटर म्हणाला.
"पण त्या बाईंनी मला हे दिलं.
मला वाटतं हे फुलांसाठी आहे."



"मला काहीतरी मिळालंय," डेव्ही म्हणाला.






"डेव्ही!" पीटरम्हणाला.
"तुझा दहा सेंट खर्च केलास का?“
"मी खाऊन टाकला," डेव्ही म्हणाला.

“तू तो खरंच खाल्ला का?" पीटर म्हणाला.
"नाही," डेव्ही म्हणाला.
"त्याची एक भिंगरी मिळाली."



“अरेरे!" पीटर म्हणाला. “आताआपण
आईसाठी भेटवस्तू घेऊ शकणार नाही.
आणि आपल्याकडे पैसेही उरले नाहीत."



“मला माफ कर, पीटर," डेव्ही म्हणाला.
"काही हरकत नाही," पीटर म्हणाला.



“अरे डेव्ही!" पीटर म्हणाला.
"माझ्याकडे एक छान कल्पना आहे!
घरी परत जाताना मी तुला त्याबद्दल सांगेन."

"आपण आईला माझा लॉलीपॉप देऊ शकतो,"
डेव्ही म्हणाला.
"तो मला मिळाला तेव्हा होता
तितकाच मोठा आहे."



“अरे तुम्ही दोघं इतक्या उशिरापर्यंत कुठे होता?” आईने विचारलं.



“आम्ही तुझ्यासाठी भेटवस्तू आणायला गेलो होतो.” पीटर म्हणाला.



"खूप साऱ्या भेटवस्तू!"
"तुझ्या वाढदिवसासाठी."



"अरे देवा!" त्यांची आई म्हणाली.
"मी तर माझा वाढदिवस आहे हे विसरलेच होते!"
"मी म्हटलं होतं ना तिला आपण सांगू या
म्हणून," डेव्ही म्हणाला.




“इकडे ये आणि तुझी भेटवस्तू बघ,” पीटर म्हणाला.
"हो, ये आणि बघ," डेव्ही म्हणाला.



“किती छान आहे भेटवस्तू!" आई म्हणाली.
“तुम्हा दोघांना खूप धन्यवाद!”

"आम्ही हे तयार केलं," डेव्ही म्हणाला.
"बघ कितीतरी वस्तू आहेत!“
“आम्ही शहरातल्या प्रत्येक दुकानात गेलो,"
पीटर म्हणाला.
"औषधांचं दुकान, टोप्यांचं दुकान, घड्याळ
आणि कानातल्यांचं दुकान, पाळीव प्राण्यांचं
दुकान आणि भेटवस्तूंचं दुकान.”
“बघा," त्यांची आई म्हणाली.
"पण घासण्याच्या ब्रशचं दुकान नाही,"
असं ते म्हणाले.





"तुला हे खरंच आवडलं का?" पीटर म्हणाला.
"हे खूप सुंदर आहे," त्यांची आई म्हणाली.
"मला मिळालेली ही आतापर्यंतची सर्वात छान
भेट आहे!"



"तो ख्रिसमस ट्री आहे!" डेव्ही म्हणाला.
"नाही, डेव्ही," पीटर म्हणाला.
"मी तुला सांगितलं. तो ख्रिसमस ट्री नाही."





“ख्रिसमसचे झाड नाही तर मग काय आहे?”
डेव्हीने विचारले.

“मला वाटते," आई म्हणाली,
“हे वाढदिवसाचे झाड आहे.”

समाप्त